# Pradushan ek samasya essay in marathi 200 words

वाढत्या प्रदूषण मुळे होणाऱ्या हवामानात बदल आणि पृथ्वीवरचे सजीवांचे जीवन लवकर धोक्यात येईल. याचे मुख्य कारण आहे हवा, पाणी, जमीन, ध्वनी प्रदूषणासह विविध प्रदूषण आपल्याला माहित आहेत. दरवर्षी वाढणारे औद्योगिक उपक्रम, शहरीकरण आणि अयोग्य कचरा व्यवस्थापन यामुळे प्रदूषणात वाढ होत आहे.

वायू प्रदूषण होण्यामागे जास्त विषारी वायू आहेत ते म्हणजे कार्बन मोनो-ऑक्साइड, नायट्रोजन डाय-ऑक्साइड आणि सल्फर डाय-ऑक्साइड. हे इतके विषारी आहेत की त्यामुळे आपल्याला श्वसनाचे आजार होतात. दमा, खोकला यांसारखे रोग होतात. गटाराचे दूषित पाणी, कंपन्यांमधून निघणारे सांडपाणी आणि अन्य कचरा नद्यांत किंवा समुद्रात टाकणे. यामुळे पाण्यात राहणाऱ्या जलचर प्राण्यांना भरपूर हानी होते. जसे कि  आपण जे मासे खातो ते सुद्धा याच पाण्यात असतात. तेच मासे आपण खाल्ले तर आपल्यला हि धोका निर्माण हातो. जास्त प्रमाणात रासायनिक खतांचा वापर केला तर शेत जमिनीवर आणि पिंकावर नकारात्मक परिणाम होतो. जमिनीची सुपीकता कालांतराने कमी होते. हल्लीच्या दिवसात शहरीकरणामुळे बांधकामाचे प्रमाण खूप वाढत आहे. नवीन पूल, मेट्रो आणि कंपनी बांधकाम यामध्ये वापरणारे यंत्र, जाड मशीन यामुळे ध्वनी प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. ज्यांना आधीच ह्रदयाचा त्रास आहे त्यांना जास्त ध्वनी मुळे त्रास होऊ शकतो.

आता आपण पाहूया कि प्रदूषण कमी प्रमाणावर होईल यावर आपण काय काय पावले उचलू शकतो ते पाहूया. यासाठी सामाजिक आणि सरकारी पातळीवर काम करणे गरजेचे आहे. सर्वांनी एकत्र येऊन प्रदूषण थांबवण्यासाठी कार्य केले तर आपण आपल्या पृथ्वीवरील जीवन वाचवू शकतो. वायू प्रदूषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक यंत्रांचा वापर करणे. वीज निर्मिती साठी सौर ऊर्जेचा वापर करणे. सेंद्रिय शेतीला प्राधान्य देणे. ओला कचरा सुख कचरा याचे विभाजन करणे ज्याने करून कचऱ्याची योग्य विल्हेवाट करून जमीन आणि पाणी सुरक्षित करू. प्रदूषण कसे थांबवावे यासाठी उपक्रम चालवणे. लगेच प्रदूषण कमी होणे शक्य नाही पण प्रदूषणाला हळू हळू आळा बसवू शकतो.